महाराष्ट्र राज्य सेवा [वैधकीय देखभाल] नियम, १९६१ मधील नियम २ [३][तीन] टीप - पाच [सात]

निवृत्तीवेतन घेत असलेल्या शासकीय कर्मचा-यांच्या आई-वडिलांच्या निवृत्ती वेतनाची मर्यादा रू. २५० वरून रू. ५००/- इतकी वाढविण्याबाबत....

महाराष्ट्र शासन,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
शासन निर्णय क्र. एमएजी/१०९२/६३४/सीआर-६५/आरोग्य-७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक २१-८-१९९२.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्य सेवा [वैधकीय देखभाल] नियम, १९६१ मधील नियम २ [३] मध्ये कुटुंबाच्या व्याख्येचे विश्लेषण करण्यात आले आहे. कुटुंबाच्या व्याख्येमध्ये नियम २[३] टिप [पाच] मधील तरतुदीनुसार वैधकीय खर्चाची परिपूर्ती मिळण्यास पात्र असलेल्या अवलंबित व्यक्तिचा समावेश करण्यात आला आहे. परंतु त्याच नियमाच्या नियम २[३] [सात] नुसार शासकीय कर्मचा-यांचे आई -वडील की, ज्यांचे कमाल निवृत्तीवेतन रू. २५०/- चे आत असेल तर त्यांनी शासकीय कर्मचा-यांवर अवलंबून असल्याचे समजण्यात येते.

सध्या अस्तित्वात असलेल्या नियमानुसार शासकीय कर्मचा-यांचे सेवानिवृत्त आई-वडिलांच्या मूळ निवृत्त वेतनाची कमाल मर्यादा रू. २५०/- वरून दरमहा रू. ५००/- पर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य सेवा [वैधकीय देखभाल] नियम १९६१ मधील नियम २[३] टीप [पाच] मधील तरतुदींच्या आधीन राहून नियम २[३][सात] नुसार शासकीय कर्मचा-यांवर अवलंबून असलेल्या आई-वडीलांचे दरमहा कमाल उत्पन्न अथवा मूळ निवृत्त वेतन रू. २५०/- ची असलेली मर्यादा दरमहा रू. ५००/- पर्यंत वाढविण्यात येत आहे.

सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व अनौपचारिक संदर्भ क्र. ३९३/९२/सेवा-५, दिनांक ३ ऑगस्ट १९९२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/- xxx
[भा. लं. निकम]
महाराष्ट्र शासनाचे अवरसचिव,

....................

क्रमांक लेखा/६/आखलि/वशी/४८२,
जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी, दि. २४-९-१९९२.

प्रति,
तहसीलदार [सर्व], उपविभागीय अधिकारी [सर्व],
विशेष भू संपादन अधिकारी [सर्व],
शाखा प्रमुख [सर्व]
२/- यांजकडे माहितीसाठी व जरूर त्या कार्यवाहीसाठी रवाना.

जिल्हाधिकारी, रत्नागिरी करिता.

| Date | २०१८ |
|---|---|
| Compliance | II |